नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २४/०१/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## घरफोडी

**१) पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत १७ कि.मी. अंतरावरील मौजा दाहोदा येथे २२.०१.२२ चे १०.३० ते १८.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सुनिल नामदेवराव डवरे, रा. दाहोदा हे आपले घराला कुलुप लावुन शेतात गेले असता अज्ञात आरोपीने त्यांचे घराचे मागचा दाराचा कोंडा तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने स्वयंपाक खोलीत सिलेंडरच्या खाली ठेवलेले नगदी २०,००० /–रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संदीप नागोसे मो नं ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील मौजा बोथिया पालोरा येथे २३/०१/२०२२ चे १३.३० वा. ते १६.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गणेश राजकुमार कुंभरे, वय ३५ वर्ष, रा. पालोरा यांचे राहते घराचे दरवाज्याचे लॉक अज्ञात आरोपीने तोडुन घरात प्रवेश केला. यानंतर आरोपीने लोखंडी गोदरेज आलमारीचा लॉक तोडुन आलमारीत ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने एकुन किमती २०,०००/– रुपयाचा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ४५४, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस नाईक संदीप नागोसे मो. नं ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर